'भटक्या विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रीचित्रणाचा चिकित्सक अभ्यास'

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या
मानव्य विद्याशाखाअंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी.
पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा प्रारूप आराखडा

:: संशोधक ::

श्री. संजीवकुमार निवृत्तीराव देवनाळे

(एम.ए.,बी.एड्.)

श्री. संत मोतीराम महाराज माध्यमिक विद्यालय व

कनिष्ठ महाविद्यालय किनगाव,

ता. अहमदपूर, जि. लातूर

:: संशोधन मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. वनमाला सोपानराव लोंढे

मराठी विभाग प्रमुख,

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता. जळकोट जि. लातूर

:: संशोधन केंद्र ::

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय,

उदगीर, जि. लातूर (महाराष्ट्र)

जानेवारी - 2024

"भटक्या विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रीचित्रणाचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :-

मराठी साहित्यामध्ये अनेक प्रकार आहेत. यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, भटक्या जाती-जमातीचे साहित्य, आदिवासी साहित्य असे विविध साहित्याचे प्रकार आहेत. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी साहित्यातील भटक्या विमुक्तांच्या साहित्यामधील स्त्रियांचे चित्रण याबाबत सविस्तर आणि चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

याबाबतचा अभ्यास करताना भटक्या विमुक्त जाती आणि जमाती म्हणजे काय याबाबतचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील भटक्या जाती-जमाती :

भटक्या या शब्दाचा उगम ग्रीक भाषेतील नोमो या शब्दापासून नोमॅड हा इंग्रजी शब्द तयार झाला आणि नोमॅडपासून मराठी मध्ये भटका हा शब्द तयार झालेला आहे.

1) प्रा. मोतीलाल राठोड यांनी भटक्यांची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे. एका ठिकाणी न थांबणारा म्हणजे भटका होय.

2) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते "उदरनिर्वाहकरिता निवडलेल्या अगर वाटयास आलेल्या व्यावसायानिमित्त, अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणा·या लोकांना भटके म्हणतात. इंग्रजीत ज्यांचा उलेख नोमॅडस असा करतात." नोमॅड हा शब्द नोमी किंवा नोमो (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. स्वत:चे कायम स्वरुपाचे घर किंवा शेत जमीन नाही परंतु गुरांचे कळप आहेत असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधात सतत भटकत असतात. अशा लोकांना उद्देशून नोमॅड हा शब्द वापरला जातो.

3) रामनाथ चव्हाण भटका या विषयी म्हणतात. "ज्यांना वेशीच्या आतल्याही जगात स्थान मिळाले नाही आणि वेशीच्या बाहेरही जे स्थिर होऊ शकले नाहीत. परंतु आतल्या आणि बाहेरच्या लोकांच्या आश्रयाने वर्षांनुवर्षे आपली उपजीविका करीत राहिले. तरी ही इथल्या

जातीव्यवस्थेचे जे अविभाज्य घटक आहेत. असे भटका आणि विमुक्त या नावाने ओळखतात."

4) प्रा. वसंत वैद्य भटका या विषयी म्हणतात."भटक्या जमातीचे लोक एका ठिकाणाहून दुस·या ठिकाणी व्यावसायाच्या निमित्ताने जातात. त्या त्या ठराविक मोसमात उदर निर्वाहासाठी थांबतात. नंतर दुस·या गावात जातात. भटक्या जमातीतील लोक उद्दिष्टाशिवाय फिरत नाहीत. अशा प्रकारच्या गट समुदायास भटकी जमात म्हणतात."

5) डॉ.नागनाथ कदम यांच्या मते "नाव सांगायला स्वत:चे गाव नाही, राहायला घर नाही, जमिनीसारखे कायम स्वरुपाचे उत्पन्नाचे साधन नाही, उपेक्षित जगणे नशिबी आल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमित्ताने सतत भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा अथवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वत:ची उपजीविका करणारा लोकसमूह अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वेगवेगळया जाती - जमातीच्या नावाने जीवन जगतात. अशा लोकसमुहाला भटके असे म्हणतात."

वरील व्याख्येवरुन भटक्या जाती - जमातींच्या संदर्भातील संकल्पना स्पष्ट होताना दिसून येते. भटक्या विमुक्त जाती - जमातींना सांगायला गावाचे नाव नाही. गावात स्वत:च्या नावाची नोंद नाही. डोक्यावर आकाश आणि वाट निघेल तिकडे पोटाची खळगी भरण्यासाठी जमिन तुडवत जाणारा हा भटका समाज भटक्या या नावाप्रमाणे सतत भटकंती करतो असा समुह होय. भटक्या - विमुक्तांच्या या स्पष्टीकरणानंतर प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील भटक्या- विमुक्त जाती जमातींचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक , धार्मिक, शौक्षणिक व राजकिय जीवनाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या भटक्या - विमुक्त जाती जमातीचे अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते.

भटक्या - विमुक्तांचे साहित्य :

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात जे प्रवाह निर्माण झाले त्यात भटक्यांचे साहित्य महत्वपूर्ण समजले जाते. भटक्यांच्या साहित्यात कथा, कविता, कादंबरी व आत्मकथन या साहित्य प्रकरातून भटक्या समाज जीवनाची व त्यांच्या सांस्कृतिक जीवनांचे चित्रण झालेले आहे. भटक्यांच्या साहित्यातून व्यक्त होणारे जीवनमूल्य व सामाजिक मूल्य प्रस्थापित साहित्याला हादरा

देत विश्वव्यापी झाले आहे. भटका समाज आज इथं, उदया तिथं तर परवा कुठ यांची पुसटशीही जाणिव नसलेला क्रुद्ध भूकेला क्षमविण्यासाठी वाट निघेल तिकडे तो जमीन तुडवत जातो. आपल्या भटकंतीच्या काळात वाटयाला आलेला भोगवटा व त्यासाठी त्याने केलेला संघर्ष शब्दातून मांडून यातहिन जीवन जगापुढे आणले. भटक्या - विमुक्तांच्या साहित्य रुपाने नविन जाणिवा, संवेदना व अनुभवविश्व उदयाला आल्याने त्यांच्या वेदना हया व्यथा व कथा बनल्या याचेच चित्रण साहित्यात झालेले आहे. भटक्या-विमुक्तांच्या सततच्या भटकंतीमुळे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, अवहेलना, भूक व दाहकता दिसून यते. भटक्या-विमुक्तांच्या अशिक्षितपणामुळे दैववाद, अंधश्रध्दा, रुढी, प्रथा, परंपरा, नवस - सायस व यात्रा हे कातडीसारखे चिकटूण राहिल्याने हा समाज सतत कर्जबाजारी होतो. याचाच परिणाम त्यांच्या जीवनमानावर होऊन त्यांचे जीवन बकालपणाचे बनते. भटक्या-विमुक्तांचे साहित्य हे केवळ वेदनांचा भाग नाही तर त्या त्या जातीतील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शौक्षणिक, सांस्कृतिक व वास्तविक परिस्थितीचे दर्शन आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये भटक्या-विमुक्तांच्या कथा, कविता, कादंबरी व आत्मकथन या साहित्य प्रकारात चित्रित झालेल्या समाजजीवनांचा निवडक व प्रातिनिधिक साहित्यकृतिच्या आधारे अभ्यास करण्यात येणार आहे.

भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री-चित्रण

भटक्या-विमुक्तांचे साहित्य वेगवेगळया जाणिवायुक्त असल्याने त्यातून कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनांचे चित्रण झालेले आहे. त्यासाठी भटक्यांची आत्मकथने समृद्ध व संपन्न आहेत. भटक्यांच्या आत्मकथनातून सामाजिक व्यथा-वेदनांच्या चित्रणाबरोबरच भटक्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती स्पष्ट होताना दिसून येतात. भटका समाज सतत भटकंती करत असल्याने सर्वच भौगोलिक प्रदेशाशी त्याचा संबंध येतो त्यामुळे तेथील परिसराशी त्याला करावी लागलेली समरसता व त्यासाठी त्याला करावा लागलेला संघर्ष याचेही चित्रण आत्मकथनकार आपल्या आत्मकथनात करतात. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातून येणारे स्त्री व्यापक व अफाट स्वरुपाचे आहे. भटक्या स्त्री विना भटका समाज अपुरा आहे. भटक्या स्त्री शिवाय या समाजाचा संसार गाडा हाकलाच जाऊ शकत नाही. भटकी स्त्री पतीला खांदयाला-खांदा लावून सहकार्य करते. एवढेच नाही तर पोलीस, पुढारी व सावकार यांच्या अन्याय, अत्याचाराला तिच प्रथम बळी ठरते. यांच्या पासून आपल्या पतीला वाचविण्यासाठी ती आपला जीव धोक्यात घालते. भटक्या पुरुषाचे सरंक्षण

करण्यासाठी भटकी स्त्री ढाल म्हणूनच उभी राहून सर्व प्रहार स्वत:च्या अंगावर झेलते. परंतु भटक्या स्त्रीला दिली जाणारी वागणूक, समाजातील तिचे स्थान, तिला सहन कराव्या लागणा-या नरक यातना, तिचे कष्टमय जीवन, तिला करावा लागलेला संघर्ष, जातपंचायतीने तिची केलेली क्रुर चेष्टा व एकंदरीत तिची जीवन जगण्याची पद्धती या सर्व गोष्टींचे चित्रण आत्मकथनात झालेले आहे. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातून चित्रित झालेली स्त्री ही आजी, आई, पत्नी, मावशी, मामी, बहिण, चुलती, वहिणी, मामीची सासू, सून, मुलगी, मैत्रिण व देवदासी अशा वेगवेगळ्या कौटुंबिक संदर्भाने पाहवयास मिळते. विविधतेने आलेल्या भूमिकांचे स्त्री चित्रण प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण रचना :

"भटक्या विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रीचित्रणाचा चिकित्सक अभ्यास" या संशोधनासाठी पुढीलप्रमाणे प्रकरणाची मांडणीचे प्रयोजन असून त्याप्रमाणे प्रकरणनिहाय अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : मराठीतील भटक्या, विमुक्त यांच्या साहित्याचा उगम आणि विकास :

पहिल्या प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या भटक्या-विमुक्त जातीचा आढावा घेताना त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय जीवनांचा धांडोळा घेतलेला आहे. भटक्या-विमुक्त जातीतील प्रत्येक जात स्वत:ला स्वतंत्र मानत असल्यामुळे त्यांच्यात एकसंघता दिसून येत नाही. भटक्या समाजातील प्रत्येक जात पोटातील क्रुद्ध भूकेला क्षमविण्यासाठी भटकंती करते. हा भटका समाज सतत भटकंती करत असल्यामुळे तो स्थायी जीवन जगत नाही त्यामुळे तो शिक्षण आरोग्य व शासकीय योजनेपासून वंचित आहे. तसेच शासनही त्यांच्याकडे अनास्थेच्या दृष्टीकोनातून पाहातो. त्यामुळेच हा समाज मूलभूतसुविधेपासून कोसो मैल दूर आहे. भट□ु समाज अज्ञानी असल्यामुळे त्यांच्यात अंधश्रद्धा अधिक प्रमाणात पहावयास मिळते. हा समाज समाजावर व कुटं◌ुबावर आलेले संकट दैवी कोप मानतात. त्या संकटाच्या निराकरणासाठी अनेक नवस-सायास करुन आपल्या दारिद्रयात आणखीनच भर पाडतात. याबाबतचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे : महाराष्ट्रातील भटक्या, विमुक्तांच्या साहित्याचे स्वरुप :

दुस-या प्रकरणात महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त जातीचा आढावा घेतांना त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक व राजकीय जीवनांचा मागोवा घेतलेला आहे.

प्रकरण तिसरे : मराठीतील भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रियांचे चित्रण एक विवेचन:

तिस·या प्रकरणात मराठी साहित्यात भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचा प्रवाह महत्त्वपूर्ण समजला जातो. भटक्या-विमुक्तांच्या साहित्याने मराठी साहित्याच्या प्रांतात वेगळया सौंदर्याची भर घातलेली आहे. भटक्यु-विमुक्तांच्या कथा, कविता, कादंबरी व आत्मकथन या साहित्य प्रकारातून व्यक्त होणारे सामाजिक व सांस्कृतिक जीवन त्या-त्या जाती-जमातीचा वेगळा दस्ताऐवज आहे. भटक्या-विमुक्तांच्या साहित्य रुपाने नवीन जाणिवा व अनुभव विरहित साकारलेले असल्यामुळे त्यातील त्यांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, अवहेलना, भूक व त्यांचे बकालपण दिसून येते. भटक्या-विमुक्त जाती-जमातीचे साहित्य हे केवळ वेदनांचा प्रदेश नाही तर त्या-त्या जाती-जमातींचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय व वास्तविक परिस्थितीचे दर्शन आहे. प्रस्तुत प्रकरणात भटक्या-विमुक्तांच्या साहित्य प्रकरणातील निवडक व प्रातिनिधिक कलाकृतीच्या आधारे मराठीतील भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रियांचे चित्रण प्रस्तुत प्रकरणात केले जाणार आहे.

प्रकरण चौथे : मराठीतील भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील ग्रामीण प्रादेशिक संदर्भ :

चौथ्या प्रकरणात भटक्या, विमुक्तांनी लिहिलेले साहित्य हे एका जमातीचे साहित्य नसून त्यात अनेक भटक्या, विमुक्तांनी समूहाचे साहित्य आहे. मराठी साहित्यात भटक्या, विमुक्तांनी साहित्याच्या रुपाने अन्यायग्रस्तांचे क्रांतीकारी साहित्य म्हणून ओळखले जाते. कविता, कथा, कादंबरी व आत्मकथन या साहित्य प्रकारातून व्यक्त होणारे सामाजिक व सांस्कृतिक जीवन वेगळया वैशिष्टयाने नटलेले आहे. भटक्या, विमुक्तांचे साहित्य हे जीवनवादी साहित्य असून त्यातून त्यांनी कल्याणासाठी प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात ऊलगुलान पुकारलेला आहे. भटका, विमुक्त समाज दिवसभर अंगावर ऊन, वारा, पाऊस व थंडीचा वर्षाव झेलत द·याखो·यात व दुर्गम भागात आपले संपूर्ण आयुष्य काढत राहिल्याने त्यातून अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी हा समाज सतत संघर्ष करत खितपत राहातो. भटक्या, विमुक्त

जाती व जमाती सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक सुविधेपासून दुर्लक्षित राहिलेला असल्याने त्यांच्यात दु:ख, दैन्य, दारिद्रय, अवहेलना, अज्ञानता व भूक मोठया प्रमाणात दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात मराठीतील भटक्या, विमुक्तांचे साहित्यातील ग्रामीण प्रादेशिक संदर्भांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : मराठीतील भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रियांचे आशय, वौशिष्टये व भाषाशौली

पाचव्या प्रकरणात भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रियांंचे विश्व विपूल प्रमाणात पहावयास मिळते. भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातून येणारी स्त्री ही आजी, आई, मावशी, पत्नी, सवत, मामी, चुलती, सासू, बहिण, सून, मुलगी, मौत्रीण व देवदासी अशा वेगवेगळया भूमिकांतून पहावयास मिळते. भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री विविध पातळयांवर संघर्ष करताना दिसून येते. भटक्या-स्त्रीला एका गावातून दुस·या गावी सतत भटकंती करावी लागत असल्यामुळे तिच्या जीवनाला स्थैर्य नाही. ती आपला तोकडा संसार डोक्यावर घेऊन संसाराचा गाडा हाकत मुलांच्या भूकेला क्षमविण्यासाठी अहोरात्र कष्ट करते. भटकी स्त्री पुरुषीवृत्तीची बळी ठरलेली असल्यामुळे तिला अन्याय, अत्याचार सहन करावा लागतो. त्याविरोधात ती कोठेच कैफियत मांडत नाही. त्यामुळे तिच्याजवळ संयमीपणा व सहनशीलता अधिक प्रमाणात दिसून येते. भटक्या स्त्रियां शिक्षणापासून वंचित असल्यामुळे त्यांच्यात कमालीचा अज्ञानपणा दिसून येतो. भटक्या स्त्रियांना विकणे, त्यांना गहाण ठेवणे, मुलीचा चिरा उतरवणे व देवाला देवदासी म्हणून सोडणे अशा स्वरुपाच्या प्रथेने त्यांचा अमानुष छळ केला जातो. भटक्या समाजातील जातपंचायती ह्रा बहुतांश स्त्रियांच्याच प्रकरणावर बसविल्या जातात. जातपंचायत हा पुरुषधार्जिन असून स्त्रियांच्या विरोधात निर्णय देतात. जातपंचायतीने दिलेला निर्णय स्त्रीला मान्यच करावा लागतो. भटकी स्त्री ही श्रद्धाशीलवृत्तीची असल्याने ती जन्मापासून ते मृत्यूपर्यंत अनेक विधी, रुढी, प्रथा, परंपरा, व्रत वैकल्ये व सणोत्सव साजरी करते. त्यामुळे ती समाजातील सांस्कृतिक ठेवा जतन करण्याचा प्रयत्न करते. मराठीतील भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील स्त्रियांचे आशय, वौशिष्टये व भाषाशौली याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष :

सहाव्या प्रकरणामध्ये भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री डोंगर- द-यात व दुर्गम भागात राहून जीवन जगते. तिला भौगोलिक परिस्थितीशी सामना करत आपला संसार थाटावा लागतो. भटक्या, विमुक्तांच्या स्त्रीया शिक्षणापासून वंचित असल्यामुळे ती दु:ख, दैन्य, दारिद्रय व अज्ञानाच्या खोल गर्तेत रूतून बसलेली आहे. तिचे वेगवेगळया पातळीवरुन शोषण केले जाते. भटक्या, विमुक्तांच्या स्त्रीयाना आरोग्यविषयक सुविधेपासून अलक्षित राहावे लागत असल्यामुळे त्याचा परिणाम तिच्या संततीवर होऊन कुपोषित सारख्या समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. भटक्या, विमुक्तांच्या समाजातील जातपंचायतीच्या निर्णयाने स्त्रीचे जीवन उद्ध्वस्त होते. भटक्या, विमुक्तांच्या जमातीतील स्त्रियांमध्ये श्रद्धाशील भावना प्रबळ असल्यामुळे ती रुढी, प्रथा, परंपरा, नवस-सायास, विधी, सणोत्सव व नृत्य साजरे करते. त्यामुळे ती भटक्या, विमुक्तांच्या सांस्कृतिक जीवनांचा ठेवा जीवापाड जपते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील सहा प्रकरणांच्या आधारे थोडक्यात आढावा घेऊन निष्कर्षांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ :

1) प्रा. राठोड मोतीराम, भटक्या-विमुक्तांचा जाहिरनामा, प्रकाशक, प्रा.मोतीराम राठोड. औरगांबाद.

2) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी शब्दकोश खंड 12. 1985

3) चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तिसरी आवृती 2000

4) डॉ. कदम नागनाथ, महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य, प्रतिभा प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 1995

5) खरात शंकरराव,भटक्या -विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न,सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2003

6)	डॉ. देवगावकर एस.जी., महाराष्ट्रातील निवडक जाती - जमाती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती 2009.

7)	मोरे दादासाहेव गबाळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, व्दितीयावृती 1990.पृ.क्र.मनोगत -1.

8)	कळसे वौजनाथ, आयरणीच्या धना, साकेत प्रकाशन, औरगाबंाद. प्रथमावृत्ती, 1986.

9)	वाघमोडे गुलाब, रानभौरी, वनश्री प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती 1986.

10)	गायकवाड लक्ष्मण, उचल्या,श्रीविद्या प्रकाशन पुणे. पाचवी आवृत्ती, 2000.

11)	राठोड आत्माराम, ताण्डा राजदूत प्रकाशन, यवतमाळ, दुसरी आवृत्ती 2002.

12)	सौ. गि·हे जनाबाई, मरणकळा, गि·हे प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृती 1992.

13)	काळे किशोर, कोल्हाटयाचं पोर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती 1994 पृ.क्र. मनोगत.

14)	नलावडे रामचंद्र, दगडफोडया देशमुख आणि कंपनी पुणे. प्रथमावृत्ती 2000 पृ क्र.मनोगत.

15)	पवार अशोक, बि·हाड, दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती. 2001. पृ.क्र. 7.

16)	राठोड प्रदिप, साखळदंड, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2003.

17)	जाधव सरदार, कोयता, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद. प्रथमावृत्ती 1994.

18)	गायकवाड लक्ष्मण, वडार वेदना, परचुरे प्रकाशन मंदीर, मुंबई, प्रथमावृत्ती डिसंबर 2000.

19)	मोरे दादासाहेब , अंधाराचे वारसदार, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे.प्रथमावृत्ती 2001.

20)	सरकुंडे माधव, सर्वा देवयानी प्रकाशन, यवतमाळ प्रथमावृत्ती एप्रिल 2000.

संशोधक

श्री. संजीवकुमार निवृत्तीराव देवनाळे

(एम.ए.,बी.एड्.,)

श्री. संत मोतीराम महाराज माध्यमिक

विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय किनगाव,

ता. अहमदपूर, जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. वनमाला सोपानराव लोंढे

संशोधन मार्गदर्शक,

मराठी विभाग प्रमुख,

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता. जळकोट जि. लातूर